| | |
|---|---|
| MHKO100005672026 | **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.२, गडहिंग्लज यांचे न्यायालयात**<br><br>**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ३०४/२०२६**<br>**निशाणी क्र.** |

१. गुन्हा घडल्याची तारीख - १३/१०/२०२५.
२. फिर्याद दाखल तारीख - १३/१०/२०२५.
३. फिर्यादीचे नांव - महाराष्ट्र शासन तर्फे,
नेसरी पोलीस ठाणे,
ता. गडहिंग्लज, जि.कोल्हापूर.

४. आरोपीचे नांव - **प्रथमेश विक्रम घेवडे,**
व.व.१९, व्यवसाय- मजुरी,
रा. हसुरचंपू,
ता. गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

५. गुन्हयाचा तपशील खालीलप्रमाणे आहेः-

दिनांक १३/१०/२०२५ रोजी १८.३० वाजताचे सुमारास नेसरी ते गडहिंग्लज जाणारे रोडवर, राज्य मार्ग क्र.१३० वर, कोवाड फाटा, नेसरी, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर येथे तुम्ही तुमचे ताब्यातील वाहन क्र. एमएच-०९-एडी-९३४२ हे वाहन दारुसारखे मादक पदार्थाचे सेवन करुन धोकादायकरित्या चालवत असताना मिळून आलात आणि त्यायोगे तुम्ही मोटर वाहन कायदा १९८८ चे कलम १८५ प्रमाणे शिक्षेस पात्र असलेला गुन्हा केलेला असून मी गुन्हयाची दखल घेतली आहे.

आणि मी याद्वारे असे निर्देश देतो की, तुमची उपरोक्त आरोपाकरीता हया न्यायालयाद्वारे न्याय चौकशी करणेत यावी.

दिनांकः ०१/०६/२०२६.
गडहिंग्लज.

**( एस. डी. मेहता )**
प्रभारी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२, गडहिंग्लज.

**आरोपीचे निवेदन**

प्र. १ ला. - पोलीसांनी दाखल केलेल्या खटल्याचे कागदपत्र तुम्हाला मिळाले काय ?
उत्तरः - होय.

प्र. २ रा. - गुन्हयाचा तपशील आता वाचून दाखविला व समजावून सांगितला, तो तुम्हाला समजला काय ?
उत्तरः - होय.

प्र. ३ रा. - तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?
उत्तरः - होय.

दिनांकः ०१/०६/२०२६.
गडहिंग्लज.

**( एस. डी. मेहता )**
प्रभारी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२, गडहिंग्लज.

......................................
आरोपीची सही/अंगठा.

## <u>कारणे</u>

आरोपीने वरील गुन्हा कबुल केला आहे. आरोपीकडे मी प्रत्यक्ष विचारणा केली. त्याने कोणत्याही दबावास अथवा मोहास बळी न पडता गुन्हा कबुल केल्याची माझी खात्री पटली. त्यामुळे, आरोपीला वरील गुन्हयासाठी दोषी धरणेत येत आहे. मी शिक्षेच्या मुद्दयावर आरोपीचे म्हणणे ऐकले. त्याने असे सांगितले की, त्याचेवर त्याचे कुटुंबाचे पालन पोषणाची जबाबदारी आहे, त्यामुळे, त्याने कमीत कमी शिक्षा करणेची विनंती केली. वरील परिस्थिती व गुन्हयाचे स्वरुप विचारात घेता आरोपीला सौम्य स्वरुपाची शिक्षा करणे न्यायाचित ठरेल, असे मला वाटते. त्यामुळे, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करतो.

## <u>आदेश</u>

०१. आरोपी नामे **प्रथमेश विक्रम घेवडे** यांस मोटर वाहन कायदा कलम १८५ अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या गुन्हयाकरिता भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम २७५ प्रमाणे दोषी धरणेत येत आहे.

०२. आरोपीस **रक्कम रु.२,०००/- (रुपये दोन हजार मात्र)** द्रव्य दंडाची शिक्षा सुनाविण्यात येत आहे. दंड न भरल्यास आरोपीने ५ दिवस साध्या कारावासाची शिक्षा भोगावी.

०३. या आदेशाची प्रत आरोपीला विनामुल्य देणेत यावी.

(खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला)

Digitally signed by
SACHIN
DURGASHANKAR MEHTA
Date: 2026.06.01 15:34:05
+0530

दिनांकः ०१/०६/२०२६.
गडहिंग्लज.

**( एस. डी. मेहता )**
प्रभारी प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.२, गडहिंग्लज.